# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

# बेरोजगार / सेवा / नाविन्यपूर्ण सहकारी संस्था व इतर अनुषंगिक सहकारी संस्थांचे कर्ज धोरण

Z:\Vaishu\karj dhoran 2021\covering 2021.doc/31

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## बेरोजगार /सेवा / नाविन्यपूर्ण सहकारी संस्था व इतर अनुषंगिक सहकारी संस्थांचे कर्ज धोरण

**अद्यावत झालेला बदल दिनांक ०१/१०/२०२१ पर्यंत**

**४७/८ वी संचालक मंडळ सभा दिनांक २८/०९/२०२१**
**ठराव क्रमांक : २७ (दिनांक २०/१०/२०२१ पासून लागू )**

### कर्जदार संस्थांसाठी पात्रता निकष

१. नोंदणीकृत बेरोजगार/सेवा/नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकारी संस्था बँकेची सभासद असली पाहिजे.

२. नोंदणी नंतर कार्यान्वीत होवून एक वर्षे पूर्ण झालेल्या तसेच शासकीय लेखापरिक्षण झालेल्या संस्था कर्ज मंजूरीस पात्र होतील.

३. लेखापरिक्षण वर्ग "अ" किंवा "ब" असणाऱ्या संस्था कर्ज मंजूरी पात्र राहतील. "क" लेखापरिक्षण वर्ग असलेल्या संस्था कर्ज मंजूरीस पात्र राहणार नाहीत.

४. संस्थेच्या उद्देशास अधिन राहून त्याप्रमाणे संस्थेस खेळते भांडवलासाठी येणे बिलाच्या तारणावर क्लिन कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा/बिल्स डिस्काऊटींग/अल्प मुदत कर्ज सुविधा किंवा संस्थेच्या प्रकल्प अहवालानुसार मध्यम मुदत कर्ज मंजूर केले जाईल.

५. प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील सी.ए.नी छाननी करुन फंड फ्लो व कॅश फ्लो स्टेटमेंट, संस्थेचा नफा व पुढील ५ वर्षातील आवक जावक नक्त मिळकत बँक कर्ज परतफेडीच्या हप्त्यापेक्षा जास्त असावी. याबाबत सी.ए.चा अभिप्राय आवश्यक. संस्थेकडे प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी पायाभूत सुविधा (तांत्रिक पदाधिकारी /स्टाफ/आवश्यक, शासकीय परवाने इतर तद्नुषंगिक सोयी-सुविधा) असणे गरजेचे राहिल.जागा भाडयाची असल्यास भाडेकरार ११ वर्षाचा व नोंदणीकृत असावा.

५.१ शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनांमध्ये ६ ते ९ महिने या कालावधीसाठी असणाऱ्या कामासाठी लॉटरी पध्दतीने संस्थांची निवड करण्यात येत असल्याने निविदा भरतांना इसाऱ्याची रक्कम (ई.एम.डी.) भरणा करावी लागत नसल्याने अशा निविदा भरणा करण्यासाठी इसा-याची रक्कम मागणी करणा-या संस्था कर्ज मंजूरीस पात्र होणार नाहीत.

५.२ शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनांमध्ये ई-टेंडरींग पध्दतीनुसार काढण्यात येणाऱ्या रु.३.०० लाखाचे वरील निविदासाठी इसाऱ्याची रक्कम (ई.एम.डी.) भरणा करावी लागते.

५.३ लॉटरी व ई-टेंडरींग पध्दतीने काढण्यात येणाऱ्या निविदामध्ये पात्र झालेल्या संस्थांना संबंधीत आस्थापनांकडून वर्क ऑर्डर देण्यात येते. त्यामध्ये संस्थेने भरावयाची सुरक्षा ठेव (एस.डी.) रक्कम नमूद केलेली असते. तेवढीच रक्कम कर्ज म्हणून उपलब्ध करण्यात येईल.

५.४ शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनांच्या निविदा भरण्यासाठीचे त्यांचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या संस्थाच बँकेकडे इसाऱ्याची रक्कम (ई.एम.डी.) व सुरक्षा ठेव (एस.डी.) कर्ज मंजूरीस पात्र होतील.

५.५ संस्थेच्या ठराव व पत्राद्वारे केलेल्या मागणीनुसार इसाऱ्याची रक्कम (ई.एम.डी.) व सुरक्षा ठेव (एस.डी.) रक्कम पे-ऑर्डर / बँक गॅरंटी स्वरुपात किंवा आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी या सुविधेद्वारे आस्थापनांस अदा करण्यात येईल.

५.६ संस्थेस इसाऱ्याची रक्कम (ई.एम.डी.) व सुरक्षा ठेव (एस.डी.) रक्कम याकरीता अल्प मुदत कर्ज ३ महिने मोरॅटोरियम कालावधीसह १२ महिने परतफेडीच्या हप्त्यांनी मंजूर करण्यात येईल.

५.७ संस्थेने स्वनिधीमध्ये वाढ करण्यासाठी सभासदांकडून स्विकारलेली अतिरिक्त भाग रक्कम प्रत्यक्षात बँक खात्यात जमा केले बाबतचा पुरावा सादर करावा लागेल अन्यथा पात्र स्वनिधी आजमावतांना सदरची भाग रक्कम ग्राह्य धरली जाणार नाही.

**कर्ज मागणी अर्जसोबत सादर करावयाची कागदपत्रे**

अर्जदार संस्थेने बँकेच्या पुरस्कृत नमुन्यात खालील माहितीसह संस्थेचे खाते असणा-या बँकेच्या शाखेकडे आवश्यक शुल्क भरुन कर्ज मागणी अर्ज सादर केला पाहिजे.

१. नोंदणी प्रमाणपत्राची संस्थेच्या अध्यक्षांनी प्रमाणित केलेली प्रत.

२. संस्थेच्या पोटनियमाची अद्यावत प्रमाणित प्रत.

३. मागील महिन्याची आर्थिक स्थितीदर्शक पत्रके (तेरीज पत्रक, ताळेबंद, नफातोटा पत्रक, व्यापारी पत्रक) (शासकीय तपासणीस वा सी.ए.नी प्रमाणीत केलेली)

४. संस्थेच्या पंचकमिटी सभेचा कर्ज मागणी विषयक ठराव तसेच कर्ज मागणी अर्जावर व अनुषंगिक इतर कागदपत्रावर सहया करण्याचे अधिकार दिले संबंधी ठरावाची सत्यप्रत (उपविधीनुसार)

५. संचालक मंडळाच्या सदस्यांची नावे, वास्तव्याचा पत्ता, गावाकडील पत्ते, व्यवसाय/ नोकरीचा पत्ता, मोबाईल कमांक, फोटो, KYC नुसारची कागदपत्रे दूरध्वनी क्रमांकासह तपशीलवार माहिती.

६. खेळते भांडवली कर्ज पाहिजे असल्यास येणे बिलाचे तपशिलवार विवरणपत्र (मिळालेल्या कामाचे वर्क ऑर्डरच्या सत्यप्रतीसह)

७. प्रकल्प अहवाल फंड व कॅश फ्लो स्टेटमेंट सी.ए.नी प्रमाणीत केलेले असावे.

७.१ संस्थेने शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनाकडून निविदा मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरातीची व निविदेची छायांकित प्रत प्रस्तावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७.२ जाहिरातीनुसार प्रसिध्द झालेली निविदा भरणा करणेचा संस्थेने ठराव पारीत करुन त्याची इतिवृत्तामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील व सदर ठराव बँकेस सादर करावा लागेल.

७.३ शासकीय / निमशासकीय आस्थापनाची प्रसिध्द झालेली निविदा भरणा करणेसाठी, आवश्यक असणारी इसाऱ्याची रक्कम (EMD) व संस्थेस कामाची वर्क ऑर्डर मिळालेनंतर सुरक्षा ठेव (Security Deposit) भरणा करण्यासाठी लागणारी रक्कम बँकेकडून कर्ज मिळावे असा ठराव संमत करून त्याची इतिवृत्तामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहिल. सदरचा ठराव बँकेस सादर करावा लागेल.

**कर्ज मंजूरीचे निकष**

अ. क्लिन कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा

१. महिला सेवा संस्था - अ व ब वर्गातील संस्थांना स्वनिधीचे ३ पट किंवा जास्तीतजास्त रु.१५.०० लाख या पैकी जी कमी असेल ती रक्कम १ वर्ष मुदतीने, ६ महिन्याचे आतील येणेबिलाचे ८०% प्रमाणे उचल देण्यात येईल

२. बेरोजगार / सेवा / नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकारी संस्थांना - अ व ब वर्गातील संस्थांना स्वनिधीचे ३ पट किंवा रु.५०.०० लाख यापैकी जी कमी असेल एवढी कर्ज मर्यादा १ वर्ष मुदतीने मंजूर केले जाईल. येणे बिलांच्या (६ महिन्याचे आतील) ९०% प्रमाणे उचल देणेत येईल.

शासकीय / निमशासकीय आस्थापनाकडील कामाच्या येणे बिलांच्या (६ महिन्याचे आतील) ९०% प्रमाणे उचल देणेत येईल. खाजगी (नामांकित लि. कंपनी, नामांकित हॉस्पिटल व नामांकित शैक्षणिक संस्था इत्यादी) आस्थापनाकडील ६ महिन्याच्या आतील येणेबिले उचलीस ग्राहय धरले जातील व त्याच्या ५०% रक्कमेची उचल देण्यात येईल.

**बिल्स डिस्काऊटींग सुविधा**

अ व ब लेखापरिक्षण वर्ग व कार्यान्वित होवून एक वर्ष पूर्ण झालेल्या संस्थांना शासकीय/निमशासकीय संस्थांकडील कंत्राटी कामापोटी सहा महिन्याचे आतील येणेबिलाचे तारणावर बिल डिस्काऊटींग सुविधा ९०% प्रमाणे तसेच खाजगी (नामांकित लि. कंपनी, नामांकित हॉस्पिटल व नामांकित शैक्षणिक संस्था) आस्थापनेकडील सहा महिन्याच्या आतील येणेबिलाच्या ५०% प्रमाणे उचल देण्यात येईल.

**ब. मध्यम मुदत कर्ज**

१. सदर संस्थांना प्रकल्प खर्चाच्या/मशीनरी/इतर वाहन किंमतीचे ७५% पर्यंत मध्यम मुदत कर्ज मंजूर केले जाईल. मात्र कर्ज उचल संस्थेच्या बाहेरील कर्ज उभारण्याचे मर्यादेपर्यंत दिली जाईल.

संस्थेने बाहेरुन कर्ज उभारण्याचे मर्यादेत वाढ करणेकरीता संस्थेच्या स्वनिधीमध्ये वाढ करणे आवश्यक राहिल. तसेच याबाबतीत पदाधिका-यांचे अंडरटेकिंग घेवून सदर स्वनिधीची पूर्तता ३६ महिन्यात करावयाची आहे. संस्थेने सभासद संख्येमध्ये वाढ करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करावी.

संस्थेच्या स्वनिधीमध्ये प्रत्येक वर्षी वाढ होणे अपेक्षित आहे. संस्थेने कर्ज मंजूरीपासून पुढील ३६ महिन्यात स्वनिधीमध्ये वाढ न केल्यास मंजूर केलेली कर्ज मर्यादा कमी करुन कर्ज मंजूर पात्रतेच्या वरील येणेबाकी संस्थेस त्वरीत भरणा करावी लागेल.

२. ३ ते ७ वर्ष मुदतीचे - प्रकल्प पूर्ण होईपर्यंत मोरॅटोरियम कालावधी जास्तीत जास्त ६ महिने पर्यंत राहील.

३. मोरॅटोरियम कालावधीमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी/प्रगती पाहून मोरॅटोरियम कालावधी जास्तीत जास्त ३ महिने पर्यंत वाढविणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

**क. अल्प मुदत कर्ज (EMD व SD Loan ) :**

बेरोजगार / सेवा / नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकारी संस्था - अ व ब वर्गातील संस्थांना स्वनिधीचे ३ पट किंवा रु.१५.०० लाख यापैकी जी कमी असेल एवढी अल्प मुदत कर्ज मर्यादा १ वर्ष मुदतीने मंजूर केली जाईल.

बँकेकडून शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनामध्ये बेरोजगार / सेवा / नाविन्यपूर्व व इतर अनुषंगिक सहकारी संस्थांना निविदा भरताना द्यावी लागणारी संबंधित आस्थापनाच्या जाहिरातीमधील इसा-याची रक्कम (Earnest Money Deposit) तसेच निविदा प्रक्रियेमध्ये पात्र झाल्यानंतर वर्क ऑर्डरनुसार भरावी लागणारी सुरक्षा ठेव (Security Deposit)रक्कम अल्प मुदत कर्ज म्हणून देण्यात येईल. सदर कर्ज तीन महिने मोरॅटोरियम कालावधीसह १२ हफ्त्यामध्ये परतफेड करणे आवश्यक राहील.

**कर्ज विषयक दस्तऐवज**

मंजूर कर्जाची उचल करतेवेळी संस्थेस पुढील दस्तऐवजांची पूर्तता करावी लागेल

१. वचनचिट्टी (एकूण मंजूर कर्ज रक्कमेची व प्रत्येक उचल रक्कमेची )
२. गहाणखत
३. सातत्य हमीपत्र
४. खात्यात नावे टाकणेचे अधिकार पत्र
५. स्टँडिंग इन्स्ट्रक्शन
६. लेटर ऑफ लीन अँड लेटर ऑफ सेट ऑफ
७. संबंधित ठराव (कर्ज उचलीचे अनुषंगाने अवश्यक असलेले संचालक मंडळ सभेचे)
८. इरिव्होकेबल ॲथॉरिटी
९. मालमत्तेच्या जोखमीबाबत संयुक्त नावे विमा पॉलिसी कोणत्याही विमा कंपनीकडून घेण्यात यावी. जर कर्जदार सहकारी संस्थेने विमा पॉलीसी घेतली नाही तर बँकेमार्फत विमा पॉलीसी घेण्यात येईल. व सदर पॉलीसीचा खर्च संस्थेच्या खात्याला डेबिट टाकून वसुल करण्यात येईल.
१०. संस्थेच्या इमारतीवर बोजा निर्माण करावयाचा असल्यास इक्विटेबल मॉर्गेज
११. अटी व शर्ती मान्य केले बाबत पत्र. (ठरावासह)
१२. जादा भाग खरेदी अर्ज
१३. जॉईंट अँड सेव्हरली लायबिलीटी बॉन्ड
१४. वाहन तारण कर्ज असल्यास आर.टी.ओ.चे टी.टी.ओ.कोरे फॉर्म सह्यांसह.

## -- क्लिन कॅश क्रेडीट -- (बेरोजगार /सेवा / नाविन्यपूर्ण सहकारी संस्था व इतर अनुषंगिक सहकारी संस्थासाठी )

अटी व शर्ती

१. संस्थेस कर्ज रक्कमेच्या ५.००% टक्के इतक्या रक्कमेचे बँकेचे भाग खरेदी करावे लागतील.

२. संस्थेने गंगाजळीची संपूर्ण रक्कम या बँकेत मुदत ठेवीत स्वतंत्रपणे गुंतविल्यानंतरच कर्ज उचल देण्यात येईल.

३. संस्थेने पूर्ण केलेल्या कामाची व नविन हाती घेतलेल्या कामाची माहिती तसेच चालू कामाच्या प्रगतीचा अहवाल, मासिक तेरीज नफातोटा, ताळेबंद पत्रके दर तिमाही पध्दतीने पुढील महिन्यांच्या १० तारखेच्या आत बँकेकडे पाठविली पाहिजेत.

४. प्रत्येक तिमाही अखेर स्विकृत कामाचा अहवाल बँकेने पुरस्कृत केलेले नमून्यात पाठविला पाहिजे.

५. रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांबाबत पॅकेज पॉलिसी घ्यावी.

६. संस्थेला बँकेने कळविलेल्या त्रुटींची दोष दुरुस्ती पूर्तता अहवाल नमूद मुदतीत न आल्यास कर्ज खात्यावर उचल दिली जाणार नाही.

७ "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल. "

८. संस्थेने मंजूर कर्ज मर्यादेवर उचल करतेवेळी मिळालेल्या कामाबाबत वर्क ॲवार्डींग एजन्सीच्या आदेशाच्या मूळ प्रती बँकेस सादर करावयास पाहिजे.

९. संस्थेस काम देणा-या संबंधीत संस्थांकडून मिळालेली कामे, त्यापोटी मिळालेली रक्कमा याबाबतचा तपशील काम देणा-या संस्थेस सादर करुन त्याची एक प्रत बँकेस अग्रेसित करावी. सदरचा तपशील मिळाल्या बाबतच्या पोचपावतीची झेरॉक्स प्रत बँकेस सादर करावी.

१०. संस्थेने मंजूर कर्जाच्या उचलीसाठी तीन महिन्यात कर्ज उचल प्रस्ताव आवश्यक त्या दस्तऐवजासह सादर न केल्यास व सदर कर्ज खात्यावर जमाबाकी राहिल्यास मंजूर कर्ज मर्यादा रद्द होईल अथवा येणेबाकी राहिल्यास थकबाकी समजून कर्ज वसुलीस पात्र राहील.

११. संस्थेस बिलापोटी मिळणारे चेक्स हे बँकेच्या कर्ज खात्यामध्ये भरणा केले जातील अशा आशयाचे संस्थेचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांचेकडून सेल्फ ॲटेस्टेड हमीपत्र शाखा व्यवस्थापक यांचे समोर सह्या करुन द्यावयाचे आहे. असे हमीपत्र देवूनही संस्थेने अन्य बँकेत चेक्स भरणा केल्यास अध्यक्ष व सेक्रेटरी यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२. संस्थेची हिशेबी पुस्तके, इतर कागदपत्रे व मालमत्ता वगैरे केव्हाही तपासण्याचा अधिकर बँकेस राहील.

१३. व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल व असे होणारे व्याज त्वरीत कर्जखाती वसुलीस पात्र राहील. बँक वेळोवेळी कर्जाच्या व्याजदरामध्ये बदल करेल त्यावेळी निर्धारित केलेले व्याजदर लागू होतील.

१४. बँकेचा संस्थेच्या मालमत्तेवर प्रथम श्रेणीचा हक्क राहील.

१५. बँक कर्जाची परतफेड मुदतीत न केल्यास थकबाकीवर २ टक्के जादा दंडाचे व्याज आकारण्यात येईल.

१६. संस्थेला दिलेल्या कर्जापोटी येणे असलेल्या कर्ज रक्कमेसाठी संस्थेच्या ठेवीतून कर्जखाती वजावट करावयाचा हक्क बँक राखून ठेवीत आहे.

१७. संस्थेने ------------------------- शाखा ----------- मुंबईमध्ये असलेल्या चालू/बचत खात्यांतील रक्कम मा.कार्यकारी संचालक यांचे सुचनेनुसार कमी करुन या बँकेकडे वर्ग करावी. या खात्याबाबत बँकेने तयार केलेल्या नमून्यात "अधिकार पत्र" देणे संस्थेवर बंधनकारक आहे.

१८. संस्थेकडे दिनांक ____________ च्या ताळेबंद पत्रकाप्रमाणे सभासदांच्या भागांची रक्कम रू.________ लाख इतकी आहे. बँक कर्ज उचलीच्या कालावधीत सदरच्या रक्कमेत घट त्याप्रमाणे कर्ज मर्यादेत कपात करणेत येईल.

१९. सभासदांस दयावयाच्या मजूरीतून १० टक्के रक्कम कपात करुन संस्थेने आपले भागभांडवल वाढविले पाहिजे.

२०. संस्थेने सर्व प्रकारच्या विमा पॉलिसीज कोणत्याही कंपनीकडून उतरविणे आवश्यक राहिल.

२१. संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळ मुदतीनंतर एक महिन्याचा ग्रेस पिरीयड देण्यांत येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतिमहा रु.१२००/- लेट फी आकारण्यांत येईल व सदरची रक्कम संस्थेच्या कर्जखाती नांवे टाकून वसुल करण्यांत येईल.

२२. अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचे समाधानकारक पालन होत नाही, असे आढळून आल्यास कर्ज खात्यावरील येणेबाकी व्याजासहीत परत मागणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

२३. संस्थेस अन्य कोणत्याही बँकेत नवीन खाती उघडता येणार नाही. तसेच संस्थेच्या अन्य बँकेतील ठेवी मुदतीअंती मुंबई बँकेत वर्ग करणेबाबत ठरावासह हमीपत्र ठेवींच्या तपशिलासह शाखेस सादर करणे आवश्यक राहिल.

२४. संस्थेस अन्य कोणत्याही बँकेत नवीन खाती उघडता येणार नाही. तसेच अन्य बँकेत खाती असल्यास सदर खात्यांची माहिती बँकेस सादर करावी लागेल. संस्थेच्या अन्य बँकेतील ठेवी मुदतीअंती मुंबई बँकेत वर्ग करणेबाबत ठरावासह हमीपत्र ठेवींच्या तपशिलासह शाखेस सादर करणे आवश्यक राहिल.

२५. उपरोक्त पैकी कोणत्याही अटीत बदल करण्याचा, वगळण्याचा अथवा जादा अट समाविष्ट करण्याचा अधिकार बँकेकडे राहील.

**बिल डिस्काऊंटिंग कर्ज सुविधा**
**अटी व शर्ती**

१. संस्थेने मंजूर कर्ज रकमेच्या प्रमाणात शे.५.०० % इतके बँकेचे भाग खरेदी केले पाहिजेत.

२. संस्थेने दर तिमाही आर्थिक स्थितीदर्शक पत्रके [तेरीज, नफा- तोटा, ताळेबंदपत्रक, शिल्लक साठामाल, व्यापारी येणे देणी, आस्थापनेस/संस्थेस केलेला पुरवठा, त्यापोटी वसूल झालेली रक्कम व येणे असलेली रक्कम.] पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत पोहोचतील अशी शाखा व्यवस्थापक व मा. मुख्याधिकारी मुख्य कार्यालय, कर्ज विभाग यांचेकडे पाठवावी.

३. या सुविधेपोटी बँकेस सादर करावयाची / करावयाच्या बिलांचा वसूलपात्र कालावधी ९० दिवसांचा असावयास पाहिजे.

४. सदर सुविधेपोटी संस्थेने करावयाची उचल संस्थेच्या "बाहेरून कर्ज उभारणीचे" मर्यादेपर्यंत सिमित राहील. संस्थेच्या उपविधीत "बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा" समाविष्ट नसल्यास महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० व १९६१ मधील नियम क्रमांक ३५ तरतूदीनुसार बाहेरून कर्ज उभारावयाची कर्ज मर्यादा निश्चित केली जाईल.

५. बँक कर्जाचा विनियोग संस्थेने सभासदांचे ठेवी/भाग रक्कम परत करणेकरीता न करता नियंत्रित व अनियंत्रित माल खरेदी करीता केला पाहिजे.

६. संस्थेने शासन व महानगरपालिका पुरस्कृत संस्थांना वा अन्य नामांकित संस्था, कंपन्या यांना पुरवठा केलेल्या मालाचे किंमतीसह विवरणपत्र पुरस्कृत अधिका-यांच्या स्विकृती सहीसह वा बिले संबंधित विभागाकडून प्रमाणित करून सादर करावी लागतील. तद्नंतरच बिले बँकेकडून खरेदी करण्यात येतील/ पात्र समजण्यात येतील. जारी करण्यात आलेल्या बिलांना स्विकृती/स्वाक्षरी देण्यात येणा-या अधिका-याच्या नियुक्तीबाबतचे शासन व महानगरपालिका आस्थापनाचे/ कंपनीचे अधिकृत पत्र.

७. संस्थेने येणेबिलाचे सोबत जोडलेल्या बिलांपोटीची रक्कम धनादेश "बँक व संस्था" यांचे संयुक्त नावाने काढण्याबाबत किंवा आरटीजीएस/ एनईएफटी द्वारे बँक खाते जोडण्याचे संबंधित [भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्या. व शासन] विभागाकडून लेखी संमती पत्र सादर केल्यानंतरच सदरची कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

८. राखीव निधीच्या संपूर्ण रक्कमेची गुंतवणूक या बँकेच्या मुदत ठेवीत करून त्यावर "राखीव निधीपोटी" असा शेरा नोंदवून घ्यावा लागेल.

९. संस्थेने साठामालाचे ठिकाणी "मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचे सौजन्याने" असा फलक लावणे आवश्यक आहे.

१०. रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांबाबत फायडेलिटी विमा पॉलिसी, हातातील व वहातुकीतील रोख रक्कमेबाबत पॅकेज पॉलिसी घेतली पाहिजे.

११. संस्थेने त्यांचेकडील शिल्लक मालाच्या किंमती इतका आगीचा विमा "बँक व संस्था" यांचे संयुक्त नावाने घेवून पॉलिसी बँकेकडे ठेवावयास दिली पाहिजे.

१२. संस्थेच्या हिशेबाची पुस्तके व इतर कागदपत्रे तसेच शिल्लक साठामाल केव्हाही तपासणेचा अधिकार बँकेचे तपासणी अधिकारी यांना राहील.

१३. सदर सुविधेपोटी येणे असलेल्या रकमेवर दरमहा व्याजाची आकारणी करण्यात येईल. व असे होणारे व्याज त्वरीत भरणा करणेस पात्र राहील.

१४. बँक वेळोवेळी कर्जाच्या व्याजदरामध्ये बदल करेल त्यावेळी निर्धारित केलेले व्याजदर लागू होतील.

१५. बँकेचा संस्थेच्या मालमत्तेवर प्रथम श्रेणीचा हक्क राहील.

१६. संस्थेला दिलेल्या कर्जापोटी येणे असलेल्या कर्ज रक्कमेसाठी संस्थेच्या अन्य ठेवीतून कर्ज खाती वजावट करणेचा हक्क बँकेस राहील.

१७. डिस्काऊंटिंग केलेल्या बिलाची/बिलांची रक्कम संबंधिताकडून विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास संस्थेने आठ दिवसांचे आत रक्कम कर्ज खाती भरणा करण्याची व्यवस्था केली पाहिजे. विहीत मुदतीत रक्कमेचा भरणा न केल्यास थकीत रक्कमेवर २% प्रमाणे जादा दंडव्याज आकारण्यात येईल.

१८. बँकेला संस्थेकडून येणे असलेली कर्जावरील व्याजाची रक्कम, कायदेविषयक खर्च, कमिशन, इतर खर्च संस्थेकडून वेळोवेळी वसूल करणेचा इतर रकमा संस्थेच्या कर्ज खात्यावर नावे टाकण्याचा हक्क बँकेस राहील.

१९. संस्थेस बँकेने कळविलेल्या त्रुटींचा दोष दुरूस्ती पुर्तता अहवाल संस्थेकडून नमूद मुदतीत न आल्यास संस्थेस कर्ज खात्यावर नविन उचल दिली जाणार नाही/ वा खात्यावरील व्यवहार नियंत्रित केले जातील.

२०. वरीलपैकी कोणत्याही एका अटीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास कर्ज खात्यावरील व्यवहार स्थगित करणेचा अगर संपूर्ण कर्ज उचल रक्कम व्याजासहीत एक रक्कमी परत मागणेचा अगर संपूर्ण शिल्लक माल ताब्यात घेऊन त्याची विल्हेवाट लावणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

२१. बँकेने खरेदी केलेल्या बिलांची ९०% रक्कम संस्थेस त्वरीत उचल करता येईल. उर्वरित **१०%** रक्कम संबंधित बिल/बिले वटल्यानंतर देण्यात येईल.

२२. बिल डिस्काऊंट केलेल्या बिलाच्या तारणावर अन्य कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

२३ "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल.

२४. संस्थेने सर्व प्रकारच्या विमा पॉलिसीज कोणत्याही विमा कंपनीकडून उतरविणे आवश्यक राहील.

२५. संस्थेने प्रथम मंजूर कर्जाच्या तसेच मागिल कर्ज मर्यादा (नुतनीकरण) मंजूर कर्जाच्या उचलीसाठी तीन महिन्यांत कर्ज उचल प्रस्ताव आवश्यक त्या दस्तऐवजास सादर न केल्यास सदरची कर्ज मंजूर मर्यादा रद्द होईल. सदर कर्ज खात्यावर जमाबाकी राहिल्यास मंजूर कर्ज मर्यादा रद्द होईल अथवा येणेबाकी राहिल्यास थकबाकी समजून कर्ज वसुलीस पात्र राहील.

२६. संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळ मुदतीनंतर अेक महिन्याचा ग्रेस पिरीयड देण्यांत येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतिमहा रू.१२००/- लेट फी आकारण्यांत येईल व सदरची रक्कम संस्थेच्या कर्ज खाती नांवे टाकून वसूल करण्यांत येईल.

२७. पूर्व सुचनेशिवाय एखाद्या अटीत बदल करणेचा अगर नविन अट घालणेचा अथवा वगळणेचा अधिकार बँकेस राहील.

**मध्यम मुदत कर्ज अटी व शर्ती**

१ संस्थेस कर्ज रक्कमेच्या ५.०० टक्के इतक्या रक्कमेचे बँकेचे भाग खरेदी करावे लागतील.

२. संस्थेस आपली सर्व यंत्र सामुग्री बँकेस नजरगहाण करुन द्यावी लागेल. नजरगहाण खत पुरस्कृत नमुन्यात करुन द्यावे लागेल व त्याकरीता येणारा खर्च (उदा. स्टॅम्प डयुटी, नोंदणी खर्च ) संस्थेस सोसावा लागेल.

३. संस्थेस आपल्या सर्व यंत्र सामुग्रीचा "बँक व संस्था" यांचे संयुक्त नावाने विमा उतरवून मुळ विमा पत्र बँकेस सादर करावे लागेल.

४. संस्थेची सर्व यंत्रसामुग्री बँकेस नजरगहाण असल्याचे निदर्शक म्हणून " मुंबै बँकेस नजरगहाण " असा नामफलक यंत्रसामुग्रीचे ठिकाणी प्रदर्शित करावा लागेल.

५. संस्थेस दरतिमाहीची आर्थिक स्थितीदर्शक पत्रके पुढील महिन्याच्या १० तारखेपूर्वी बँकेस सादर करावी लागतील.

६. संस्थेची हिशेबाची पुस्तके, साठामाल, यंत्रसामुग्री व इतर मालमत्ता बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यास पूर्व सूचनेविना तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल.

७. संस्थेस आपल्या मालमत्तेवर बँकेचा प्रथम श्रेणीचा बोजा निर्माण करावा लागेल.

८. पूर्व सूचनेशिवाय व्याजाच्या दरामध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील तसेच थकीत कर्ज रकमेवर द.सा.द.शे. २% प्रमाणे थकीत तारखेपासून दंडव्याज आकारले जाईल.

९. निर्धारित तारखेस कर्ज हप्त्याची रक्कम संस्थेने भरणा न केल्यास संस्थेच्या ठेव खात्यातून सदर कर्ज हप्त्याची रक्कम वळतीकरुन घेण्याचा अधिकार बँकेस राहील.

१० व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल व असे होणारे व्याज त्वरीत भरण्यास पात्र होईल. बँक वेळोवेळी कर्जाचे व्याजदरामध्ये बदल करेल त्यावेळी मागील उचल झालेल्या कर्जास सुध्दा नवीन व्याजदर लागू होतील.

११. संस्थेच्या चालू किंवा इतर ठेव खात्यात मध्यम मुदत कर्जाचा दरमहाच्या हप्त्यांची रक्कम व देयपात्र व्याजाची रक्कम नावे टाकणेत येइल व त्याप्रमाणे खात्यावर दरमहा रक्कम राखून ठेवावी लागेल.

१२. संस्थेने सर्व प्रकारचा विमा पॉलिसीज् कोणत्याही विमा कपंनीकडून उतरविणे आवश्यक राहील.

१३. संस्थेने बाहेरुन कर्ज उभारण्याचे मर्यादेत वाढ करणेकरीता संस्थेच्या स्वनिधीमध्ये वाढ करणे आवश्यक राहिल. तसेच संस्थेने स्वनिधीमधील वाढीची पूर्तता ३६ महिन्यात करावयाची आहे. याबाबतीत संस्थेच्या पदाधिका-यांचे अंडरटेकिंग द्यावे लागेल तसेच अशा स्वनिधीची पूर्तता ३६ महिन्यात न झाल्यास संस्था पुढील कोणत्याही कर्ज मंजूरीस पात्र राहणार नाही.

१४. बँक कर्जाची उचल सहा महिन्याचे आत करावयास पाहिजे तसेच कर्जाचे हप्ते शाखा पातळीवर निश्चित करुन देणेत येतील.

१५. संस्थेच्या प्रकल्प अहवालानुसार आवश्यक त्या निविदा सादर करतेवेळी किंमतीच्या २५% रक्कम बँक खाती भरणा केलेनंतर बँक कर्जासह रक्कम संबंधित एजन्सीकडे थेट पे ऑर्डरद्वारे किंवा आरटीजीएस/एनईएफटी द्वारे अदा केली जाईल.

१६. संस्थेच्या पदाधिका-यांची तसेच पंचकमिटी सदस्यांची नावे, नोकरी/व्यवसायासह मुंबईतील व गावाकडील पत्ते रेशनकार्डच्या/ आधारकार्ड प्रती (संस्थेच्या अध्यक्षांनी प्रमाणित करुन) इत्यादी माहिती सादर करणे आवयक राहील.

१७ "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झ ाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल."

१८. संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळ मुदतीनंतर एक महिन्याचा ग्रेस पिरीयड देण्यांत येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतिमहा रु.१२००/- लेट फी आकारण्यांत येईल व सदरची रक्कम संस्थेच्या कर्जखाती नांवे टाकून वसुल करण्यांत येईल.

१९ संस्थेच्या कर्जखात्यावरील येणेव्याजाची रक्कम सातत्याने ९० दिवसापेक्षा जास्त काळ थकीत राहिल्यास अशा थकीत व्याजाच्या रक्कमेवर त्या त्या कर्जाच्या समंत दराच्या २% जादा व्याजदराने आकारणी करण्यांत येईल.

२०. उपरोक्त अटीपैकी कोणत्याही अटीत बदल करणे, वगळणे किंवा नव्याने अटी समाविष्ट करणेचा अधिकार बँकेस राहील.

**[ वाहनतारण ]**

अटी व शर्ती :-

१. संस्थेस कर्ज रकमेच्या ५.०० % इतक्या रकमेइतके बँकेचे भाग खरेदी करावे लागतील.

२. संस्थेस वाहनाचा विमा "बँक व संस्था" यांचे संयुक्त नावे घ्यावा लागेल. सदरची विमा पॉलीसी सर्व समावेशक असावी. दरवर्षी नुतनीकरण करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तथापि संस्थेने विमा पॉलिसीचे नुतनीकरण न केल्यास संस्थेच्या बँकेकडील कोणत्याही खात्यावर तवेढी रक्कम नावे टाकून विमा पॉलीसीचे नुतनीकरण करणेत येईल.

३. संस्थेने बँक कर्ज रक्कमेमधून खरेदी केलेले वाहन बँकेकडे नजरगहाण ठेवून वाहनावर "मुंबै बँक" यांचे सौजन्याने असा नामोल्लेख करून रंगवून घेतला पाहिजे. सदर वाहन बँक कर्जाची रक्कम व्याजासह परतफेड होईपर्यंत विकता येणार नाही.

४. संस्थेने एकूण किंमतीच्या (विमा, बांधणी व इतर खर्चासह) २५ % रक्कम बँकेत जमा केलेनंतर बँक कर्जासह एकूण रक्कमेचे पेमेंट निविदाधारकांना पे ऑर्डरव्दारे किंवा आरटीजीएस/ एनईएफटी द्वारे थेट अदा केले जाईल.

५. संस्थेने अन्य जिंदगीवर बँकेचा प्रथम श्रेणीचा हक्क प्रस्थापित केला पाहिजे.

६. व्याजाची आकारणी दरमहा अखेर करण्यांत येईल. सदरील व्याज त्वरीत देयपात्र होईल. बँक वेळोवेळी कर्जाचे व्याजदरात बदल करेल त्यावेळी निर्धारीत केलेले व्याजदर लागू होतील.

७. संस्थेच्या चालू किंवा इतर ठेव खात्यात मध्यम मुदत कर्जाच्या परतफेडीच्या दरमहाच्या हप्त्याची व देयपात्र होणा-या व्याजाची रक्कम नावे टाकणेत येईल. त्याप्रमाणे खात्यावर रक्कम राखून ठेवावी लागेल. थकीत कर्ज रक्कमेवर २ % प्रमाणे थकीत तारखेपासून दंडव्याज आकारले जाईल.

८. मंजूर कर्जाची उचल सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक राहील.

९. संस्थेने बँकेच्या तपासणी अधिका-यांना किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास पूर्व सुचनेविना भेटीच्यावेळी संस्थेची हिशेबी पुस्तके, दप्तर, साधनसामुग्री, वाहन व इतर मालमत्ता तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावयास पाहिजे.

१०. संस्थेस खरेदी करावयाचे नविन वाहन बँकेस नजरगहाण करून द्यावे लागेल. तशा आशयाची नोंद संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयात व (नोंदणी पुस्तकात) वाहनाच्या आर.सी.बुकात करावी व त्याची प्रत बँकेकडे सादर करावयास पाहिजे.

११ "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तरोच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल."

१२. संस्थेस दरतिमाही आर्थिकपत्रके (तेरीज, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक) बँकेस पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावी लागतील. आर्थिक पत्रके विहीत वेळेत सादर न केल्यास बँक नियमाप्रमाणे चार्जेस आकारण्यात येतील.

१३. संस्थेस वाहनास प्रवासी वाहतूकीबाबत मिळालेला प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून परवाना (परमिट) सादर केल्यानंतरच मंजूर कर्जावर कर्ज उचल दिली जाईल.

१४. संस्थेने बाहेरुन कर्ज उभारण्याचे मर्यादेत वाढ करणेकरीता संस्थेच्या स्वनिधीमध्ये वाढ करणे आवश्यक राहिल. तसेच संस्थेने स्वनिधीमधील वाढीची पूर्तता ३६ महिन्यात करावयाची आहे. याबाबतीत संस्थेच्या पदाधिका-यांचे अंडरटेकिंग द्यावे लागेल तसेच स्वनिधीची पूर्तता ३६ महिन्यात न झाल्यास संस्था पुढील कोणत्याही कर्ज मंजूरीस पात्र राहणार नाही.

१५. संस्थेने सर्व प्रकारच्या विमा पॉलिसीज् कोणत्याही विमा कंपनीकडून उतरविणे आवश्यक राहील.

१६. कर्जाचे हप्ते शाखा पातळीवर निश्चित करून देणेत येतील.

१७. संस्थेस वाहन दर तिमाहीतून एकदा तपासणीसाठी शाखेकडे उपलब्ध करून द्यावे लागेल.

१८. पूर्व सुचनेशिवाय व्याजाचे दरात बदल करणेचा वा एखादी नवीन जादा अट समाविष्ट करणेचा अगर वगळण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहील.

**अल्प मुदत (EMD) व (SD) कर्ज / अटी व शर्ती**

१ संस्थेस कर्ज रक्कमेच्या ५.०० टक्के इतक्या रक्कमेचे बँकेचे भाग खरेदी करावे लागतील.

२. संस्थेने दरतिमाही आर्थिक स्थितीदर्शक पत्रके पुढील महिन्याच्या १० तारखेपूर्वी बँकेस सादर करावी लागतील.

३. पूर्व सूचनेशिवाय व्याजाच्या दरामध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील तसेच थकीत कर्ज रकमेवर द.सा.द.शे. २% प्रमाणे थकीत तारखेपासून दंडव्याज आकारले जाईल.

४. निर्धारित तारखेस कर्ज हप्त्याची रक्कम संस्थेने भरणा न केल्यास संस्थेच्या ठेव खात्यातून सदर कर्ज हप्त्याची रक्कम वळतीकरुन घेण्याचा अधिकार बँकेस राहील.

५. व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल व असे होणारे व्याज त्वरीत भरण्यास पात्र होईल. बँक वेळोवेळी कर्जाचे व्याजदरामध्ये बदल करेल त्यावेळी मागील उचल झालेल्या कर्जास सुध्दा नवीन व्याजदर लागू होतील.

६. संस्थेच्या चालू किंवा इतर ठेव खात्यात अल्प मुदत कर्जाचा दरमहाच्या हप्त्यांची रक्कम व देयपात्र व्याजाची रक्कम नावे टाकणेत येइल व त्याप्रमाणे खात्यावर दरमहा रक्कम राखून ठेवावी लागेल.

७. संस्थेने सर्व प्रकारचा विमा पॉलिसीज् कोणत्याही विमा कपंनीकडून उतरविणे आवश्यक राहील.

८. संस्थेने बाहेरुन कर्ज उभारण्याचे मर्यादेत वाढ करणेकरीता संस्थेच्या स्वनिधीमध्ये वाढ करणे आवश्यक राहिल. तसेच संस्थेने स्वनिधीमधील वाढीची पूर्तता ३६ महिन्यात करावयाची आहे. याबाबतीत संस्थेच्या पदाधिका-यांचे अंडरटेकिंग द्यावे लागेल तसेच अशा स्वनिधीची पूर्तता ३६ महिन्यात न झाल्यास संस्था पुढील कोणत्याही कर्ज मंजूरीस पात्र राहणार नाही.

९. संस्थेच्या पदाधिका-यांची तसेच पंचकमिटी सदस्यांची नावे, नोकरी/व्यवसायासह मुंबईतील व गावाकडील पत्ते रेशनकार्डच्या/आधारकार्डच्या प्रती (संस्थेच्या अध्यक्षांनी प्रमाणित करुन) इत्यादी माहिती सादर करणे आवयक राहील.

१०. "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल."

११. संस्थेच्या कर्जखात्यावरील येणेव्याजाची रक्कम सातत्याने ९० दिवसापेक्षा जास्त काळ थकीत राहिल्यास अशा थकीत व्याजाच्या रक्कमेवर त्या त्या कर्जाच्या समंत दराच्या **२%** जादा व्याजदराने आकारणी करण्यांत येईल.

१२. संस्थेस शासकीय /निमशासकीय खाजगी अस्थापनाकडे भरणा करावी लागणारी EMD व SD ची रक्कम पे-ऑर्डर / बँक गॅरंटी / आरटीजीएस/एनईफटी/ या सुविधेद्वारे अदा करणेत येईल.

१३. संस्थेस बँक कर्जामधून अदा केलेली इसाऱ्याची रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम संबंधीत आस्थापनांकडून परत मिळाल्यानंतर सदर रक्कम कर्ज खाती जमा करण्यात येईल. याबाबत संस्थेने ठराव सादर करावा लागेल.

१४. संस्थेने बँक कर्ज रक्कमेसोबतच इसा-याची रक्कम (ईएमडी) व सुरक्षा ठेव (एसडी) पोटी घेतलेल्या कर्जाची रक्कम व्याजासह तीन महिने मोरॅटोरियम कालावधीसह १२ मासिक हप्त्यामध्ये कर्ज खाती भरणा करणे आवश्यक राहील.

१५. पूर्व सुचनेशिवाय व्याजाचे दरात बदल करणेचा वा एखादी नवीन जादा अट समाविष्ट करणेचा अगर वगळण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहील.